**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव २१ (        ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो (महिला) स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी पात्रता फेरीतील साखळी सामन्यात प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत विजय प्राप्त केला. यजमान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला प्रतिस्पर्धी संघ न आल्यामुळे या फेरीत पुढे चाल मिळाली.

बुधवारी पहिला सामना ब गटात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे विरूध्द राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्यात झाला. पुणे विद्यापीठाने आक्रमक खेळ करत १ डाव आणि ७ गुणांनी (१५-८) विजय प्राप्त केला. पुण्याकडून मयुरी मुत्याळ ही ३.१० मिनीटे खेळली व एक गडी बाद केला. श्रेया अडकरने २.५० मिनीटांचा खेळ करत एक गडी बाद केला. पुनम घोडेस्वार २.२० मिनीटे व प्रणाली दणके २ मिनीटे खेळली.

अ गटात झालेल्या सामन्यात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरने एकतर्फी विजय प्राप्त केला. १ डाव ८ गुणांनी (१४-६) सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोटवर कोल्हापूरने विजय मिळविला. कोल्हापूर कडून ज्योती शिंदेने ३ मिनीटाचा नाबाद खेळ करत चार गडी टिपले. अमृता कोकीटकरने देखील चार गडी बाद केले. कोमल शिंदे २.३० मिनीटे तर करीश्मा नागरजी २ मिनीटे खेळली. सौराष्ट्रकडून रेखाबेन चौहान व अमृताबेन गोहिल यांनी चांगला खेळ करण्याचा प्रयत्न केला.

ड गटात झालेला मुंबई विद्यापीठ विरूध्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद हा सामना अगदी एकतर्फी झाला. औरंगाबाद विद्यापीठाला १ डाव २१ (१-२२) गुणांनी पराभूत व्हावे लागले. मुंबई विद्यापीठाकडून पौर्णिमा सपकाळ ३.५० मिनीटे खेळली व ३ गडी बाद केले. ऐश्वर्या सावंतने ५.१० मिनीटांचा नाबाद खेळ करत ३ गडी टिपले. अपेक्षा सुतारने ३ आणि श्रध्दा लाडने ५ गडी बाद केले.

क गटात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ विरूध्द गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद असा सामना होणार होता. मात्र गुजरात विद्यापीठाचा संघ स्पर्धेसाठी न आल्यामुळे जळगाव विद्यापीठाला पुढे चाल देण्यात आली.

पात्रता फेरीत अ गटात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ब गटात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे, क गटात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव आणि ड गटात मुंबई विद्यापीठ,मुंबई या महाराष्ट्रातील चारही संघांनी वर्चस्व सिध्द केले आहे. सौराष्ट्र विद्यापीठ राजकोटची अमृताबेन गोहिल या खेळाडूला दुसऱ्या दिवशीची उत्कृष्ट खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.जे.बी.नाईक यांच्याहस्ते तिला पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.विजय पाटील, प्रा.एम.वाय.चव्हाण, प्रा.राजेश सोनवणे, डॉ.भालचंद्र मोरे, प्रा.किशोर वाघ, प्रा.शैलेश पाटील, प्रा.डॉ. नरेश बागल, प्रा.हसीन तडवी, प्रा.तेजस शर्मा, प्रा.भरत चाळसे, प्रा.व्ही.के.पाटील यांच्यासह क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील, सहायक क्रीडा संचालक आर.ए.पाटील व विद्यापीठातील अधिकारी कर्मचारी परिश्रम घेत आहेत. उद्या गुरूवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी चार वाजता या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार असून सहकार राज्यमंत्री गुलाबराव पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील अध्यक्षस्थानी राहणार असून प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील यांची देखील उपस्थिती असणार आहे. त्याआधी सकाळच्या सत्रात चार सामने होणार आहेत.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 — दिनांक : 21 नोव्हेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

☎ : (९१) ०२५७- (२२५७२४८, २४९, २५३) वेबसाइट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७- (२२५८४०३, ४०६) ई-मेल : pro@nmu.ac.in